ePaper ...तर तुर्कीचा खेळ खल्लास, भारताच्या निर्णयानं पाकिस्तानच्या मित्राचा गेम होणार

| वर्ष - 8 | अंक - 282 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™




## आतील पानांत


- कारागृहात रंगला क्रिकेटचा थरार!
- गुजरात टायटन्सला मोठा धक्का
- पाकिस्तान जिथे, तिथे भिकाऱ्यांची रांग
- भीतीपोटीच जनगणनेस मान्यता


www.mahaenews.com | शनिवार, दि. 17 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## भारताचा पाकिस्तानला दुहेरी दणका

# उडाली पाकची झोप!

### भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आणि अफगानिस्तानचे अमीर मुत्ताकी यांच्यात फोनद्वारे संवाद

। नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज

**पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानं सिंधू नदी जल वाटप करार स्थगित करून पाकिस्तानच्या मुसक्या आवळल्या आहेत. मात्र भारत आता पाकिस्तानला आणखी एक मोठा धक्का देण्याच्या तयारीमध्ये आहे. भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आणि अफगानिस्तानचे परराष्ट्र मंत्री अमीर मुत्ताकी यांचं गुरुवारी फोनवर बोलणं झालं. मात्र या फोनमुळे आता पाकिस्तानची झोप उडाली आहे. त्याला कारण देखील तसंच आहे.**




सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार जयशंकर आणि मुत्ताकी यांनी भारताच्या मदतीनं अफगाणिस्तामध्ये सुरू असलेले प्रकल्प पुढे नेण्यास सहमती दर्शविली आहे. या विकास प्रकल्पांमध्ये काबूल नदीवर बांधण्यात येणाऱ्या शहतूत धरण प्रकल्पाचा देखील समावेश आहे. 2021 लाच या संदर्भात भारत आणि अफगाणिस्तानमध्ये एक करार झाला होता, मात्र अफगाणिस्तानमध्ये झालेल्या सत्ताबदलानंतर या कराराला ब्रेक लागला होता.

पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पुन्हा एकदा आता या करारावर चर्चा सुरू झाली आहे. काबूल नदीवर हे धरण बांधण्यात येणार आहे, या प्रकल्पासाठी भारत अफगाणिस्तानला 236 मिलियन डॉलर रुपयांची मदत करणार आहे. तसेच तांत्रिक मदत देखील पुरवणार आहे. तीन वर्षांमध्ये हा प्रकल्प पूर्ण होण्याचा अंदाज आहे. या प्रकल्पामुळे काबूल आणि परिसरात राहणाऱ्या तब्बल 20 लाख लोकांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळणार आहे, तसेच अफगाणिस्तानची तब्बल चार हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे, मात्र हे धरण अफगाणिस्तामध्ये झालं तर दुसरीकडे पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतामध्ये दुष्काळ पडू शकतो. खैबर पख्तूनख्वामध्ये जाणारं सर्व पाणी या धरणामुळे अडवलं जाणार आहे.

तर दुसरीकडे भारतानं सिंधू पाणी वाटप करार स्थगित केल्यामुळे पाकिस्तानच्या पंजाब प्रांतामध्ये दुष्काळ पडण्याची शक्यता आहे. पाकिस्तानमधील सुमारे 80 टक्के शेती ही सिंधू नदीच्या पाण्यावर अंवलंबू आहे. अशा पद्धतीने आता भारत पाकिस्तानची दुहेरी कोंडी करू शकतो. सिंधू पाणी वाटप करार स्थगिताचा पुनर्विचार करावा यासाठी पाकिस्तानकडून भारताला



एक पत्र देखील पाठवण्यात आले आहे. करार स्थगिताचा पुनर्विचार करावा, अशी विनंती करण्यात आली आहे.

### तर तुर्कीचा खेळ खल्लास

भारत आणि पाकिस्तान यांच्यात सध्या तणावाची स्थित आहे. याच तणावादरम्यान तुर्की या देशाने पाकिस्तानला पाठिंबा दिला. ही बाब समोर आल्यानंतर आता भारतात तुर्कीने उत्पादित केलेल्या वस्तुंवर बहिष्कार टाकला जात आहे. यामध्ये विशेषत: सफरचंदांचा समावेश आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात सध्या तणावाची स्थित आहे. याच तणावादरम्यान तुर्की या देशाने पाकिस्तानला पाठिंबा दिला. ही बाब समोर आल्यानंतर आता भारतात तुर्कीने उत्पादित केलेल्या वस्तुंवर बहिष्कार टाकला जात आहे. यामध्ये विशेषत: सफरचंदांचा समावेश आहे. हीच बाब लक्षात घेता भारताने जर एक छोटा निर्णय घेतला तर तुर्की या देशाल मोठा फटका बसू शकतो.

तुर्कीने केली पाकिस्तानला मदत

भारताने पाकिस्तानविरोधात ऑपरेशन सिंदूर राबवले. त्यानंतर पाकिस्ताननेही भारतावर हल्ले केले. याच हल्ल्यांसाठी तुर्कीने पाकिस्तानला ड्रोनच्या पुर्ततेसह इतर मदत केल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळेच आता भारतात तुर्कीच्या उत्पादनांवर बॉयकॉटचा ट्रेंड चालू झाला आहे.

### तुर्कीला होणार मोठे नुकसान?

भारतीय नागरिकांच्या बहिष्काराच्या धोरणामुळे तुर्कीला सध्या मोठा आर्थिक फटका बसतोय. ऑफ सिझन असले तरी भारतीय बाजारपेठेत तुर्कीच्या सफरचंदांची मोठी मागणी असते. भारतातील सफरचंद मात्र वर्षभरातील काही महिन्यांपुरतेच उपलब्ध असतात. दरम्यान, असे असले तरी भारतीय नागरिक सध्या तुर्कीतील सफरचंद बॅन करण्याचा निर्णय घेतला तर तुर्कीला मोठा फटका बसू शकतो. अद्याप भारताने तसा कोणताही निर्णय घेतला नाही.

### तुर्कीतून किती सफरचंद आयात केले जातात?

मिळालेल्या माहितीनुसार 2021-22 साली 563 कोटी रुपयांची, 2022 -23 मध्ये 739 कोटी रुपयांची तर 2023-24 साली 821 कोटी रुपयांचे सफरचंद तुर्कीतून भारतात पाठवण्यात आली होते. सफरचंदांच्या निर्यातीमध्ये तुर्की हा देश प्रत्येक वर्षांत प्रगती करताना दिसतोय. याचा परिणाम भारतात सफरचंदांचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांवर पडतोय. तुर्कीकडून आयात करण्यात येणारे सफरचंद त्याची गुणवत्ता आणि किमतीमुळे भारतात प्रसिद्ध आहेत. मात्र गेल्या काहि दिवसांपासून तुर्कीतील सफरचंदांवर बहिष्कार टाकण्यात येतोय. याच कारणामुळे तुर्कीतील सफरचंदांची मागणी 50 टक्क्यांनी घटली आहे. बहिष्कारामुळे व्यापारी आता काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, वॉशिंग्टन, न्यूझिलंड, इराण येथून सफरचंद मागवत आहेत.

# यशवंत बँक घोटाळ्याची चौकशी करा!

## चरेगावकर यांच्यासह संचालकांना अटक करावी : मेधा कुलकर्णी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘फलटण येथील यशवंत बँकेत दीडशे कोटींचा घोटाळा झाला असून, त्यामध्ये बँकेचे माजी अध्यक्ष शेखर चरेगावकर यांचा मुख्य सहभाग आहे. त्यांनी वेगवेगळ्या माध्यमातून बोगस कंपन्यांमार्फत कराड येथील अनेक लोकांची फसवणूक केली असून, लेखापरीक्षण अहवालातही घोटाळ्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. त्यामुळे या घोटाळ्याची केंद्रीय गुन्हे अन्वेषण (सीबीआय) विभागामार्फत चौकशी करून शेखर चरेगावकर यांच्यासह दोषी संचालकांना अटक करावी.**

,’ अशी मागणी खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी शुक्रवारी



येथे पत्रकार परिषदेत केली.‘या प्रकरणाची दखल घेऊन सहकार आयुक्तांनी त्वरित कारवाई करावी, अन्यथा सहकार आयुक्त कार्यालयात बँकेचे ठेवीदार आणि कर्जदारांना घेऊन घेराव घालण्यात येईल,’ असा इशाराही त्यांनी दिला. ॲड. नीलेश जाधव, गणेश पवार, एस. डी. कुलकर्णी आदी बँकेचे ठेवीदार आणि कर्जदारही पत्रकार परिषदेला उपस्थित होते.

कुलकर्णी म्हणाल्या, ‘चरेगावकर यांनी अनेकांच्या नावावर बोगस कर्जे काढली असून, अनेकांना जामीनदार केले आहे. ही कर्जे थकीत आहेत. कर्जाचे पैसे हस्ते-परहस्ते बोगस कंपन्यांमध्ये वळविण्यात आले आहेत. सर्व आर्थिक व्यवहारांमध्ये त्यांनी स्वत:चा आणि कुटुंबाचा फायदा करवून घेतला आहे. बँकेतील पैशांचा विनियोग खासगी मालमत्ता घेण्यासाठी करण्यात आला आहे. स्वत:च्या पदाचा दुरुपयोग करून खोटी कर्ज प्रकरणे करून त्यांनी बँकेचेही नुकासन केले आहे.’‘बँकेच्या २३० कोटींच्या ठेवी आहेत. मात्र, गैरव्यवहार झाल्याने ठेवीदारांच्या ठेवी अडचणीत आल्या आहेत. बँकेतील आर्थिक अनियमिततेबाबत तीन अहवाल आले आहेत. या संदर्भात माझ्या संपर्कात असलेल्या ठेवीदारांना शेखर चरेगावकर यांचे बंधू शार्दूल यांच्याकडून धमकावले जात आहे. सहकार खात्यातील अधिकाऱ्यांवरही कारवाई न करण्यासाठी दबाव टाकला जात आहे. मलाही ‘या प्रकरणात गप्प बसा, अन्यथा तुमचे गेल्या वेळी तिकिट कापले, तसे पुढेही पाहून घेऊ,’ अशी धमकी दिली गेली,’ असा आरोप खासदार मेधा कुलकर्णी यांनी केला.बँकेचे माजी अध्यक्ष शेखर चरेगावकर हे भारतीय जनता पक्षाशी संबंधित आहेत. भाजपच्याच राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी त्यांच्याविरोधात आरोप केल्याने हा भाजपअंतर्गत संघर्ष चव्हाट्यावर आला आहे. चरेगावकर भाजपच्या एका मंत्र्याचे निकटवर्तीय मानले जातात.येथे पत्रकार परिषद घेऊन कुलकर्णी यांचे सर्व आरोप फेटाळले होते. तसेच, कोणत्याही चौकशीला सामारे जाण्याची तयारी असल्याचेही ते म्हणाले होते.

### भाजपअंतर्गतच संघर्ष?

तसेच, महापालिकेने भूसंपादन करून न दिल्याने या कामात आर्थिक नुकसान झाल्याचे सांगून ठेकेदाराने महापालिकडे नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यास सुरुवात केली आहे. नुकसान भरपाईपोटी ७९ कोटी रुपयांचा दावा संबधित ठेकेदाराने महापालिकेकडे केला आहे. हे काम तातडीने मार्गी लावण्यासाठी महापालिकेत जोरदार प्रयत्न सुरू झाले आहेत. या दाव्यासाठी जानेवारी २०२५ मध्येच लवादाची नेमणूक करून त्यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. आता लवादासाठी महापालिका आणि संबंधित ठेकेदार यांच्यात करार करण्याचा प्रस्तावही स्थायी समितीच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला आहे.रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराकडून नुकसानभरपाई मागण्यात आली आहे.

# ‘लाडक्या बहिणीं’ना ५० हजारांचे कर्ज शक्य

## योजनेच्या माध्यमातून विचार; अजित पवार यांची माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लाडक्या बहिणींना लघुउद्योग सुरू करण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्याचा विचार राज्य सरकार करत आहे. या कर्जाचे हप्ते ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेतून वळते केले जाऊ शकतील, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते बारामतीतील मुढाळे येथील विद्युत उपकेंद्राचे भूमिपूजन झाले. त्या वेळी ते बोलत होते. पवार म्हणाले, ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे राज्य सरकारवर ४५ हजार कोटी रुपयांचा आर्थिक भार पडत आहे.**

मात्र, गोरगरीब महिलांना पैसे



मिळत असल्याने त्यांना उपयोग होत आहे. दोन कोटींहून अधिक महिलांना याचा लाभ मिळत आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था बळकट होण्यास मदत होत आहे. आता महिलांना लघुउद्योग सुरू करण्यासाठी ५० हजार रुपयांचे कर्ज उपलब्ध करून देण्याचा राज्य सरकार विचार करत आहे. त्याचे हप्ते हे या योजनेतून वळते केले जातील.’‘महायुती सरकारने सौर ऊर्जा पंप योजना आणली आहे. या योजनेतून सुमारे आठ लाख आठ हजार शेतकऱ्यांना सौर पंप देण्यात आले आहेत.

या योजनेसाठी २४ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. पंतप्रधान सूर्यगृह योजनेंतर्गत आतापर्यंत एक लाख ३० हजार घरांसाठी ५०० मेगावॉटपेक्षा जास्त क्षमतेचे छतावरील सौर ऊर्जा संच दिले आहेत. या योजनेसाठी १ हजार कोटींपेक्षा जास्त अनुदान लाभार्थ्यांना देण्यात आले आहे,’ असे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.अलीकडे बारामतीकरांना विकासकामे म्हणजे चुटकीसरशी वाटतात. मला वर्षाला पाच कोटी रुपये आमदार निधी मिळतो. म्हणजे पाच वर्षांत २५ कोटी मिळतात. तरीही शंभर दिवसांत बारामतीसाठी एक हजार कोटी रुपयांची कामे मंजूर केली आहेत. त्यामुळे आता बारामतीकर लाखांत बोलायला तयारच नाहीत. ते कोटींत बोलायला लागले आहेत,’ असे अजित पवार म्हणाले.मात्र, गोरगरीब महिलांना पैसे मिळत असल्याने त्यांना उपयोग होत आहे. दोन कोटींहून अधिक महिलांना याचा लाभ मिळत आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था बळकट होण्यास मदत होत आहे. आता महिलांना लघुउद्योग सुरू करण्यासाठी ५० हजार रुपयांचे कर्ज उपलब्ध करून देण्याचा राज्य सरकार विचार करत आहे. त्याचे हप्ते हे या योजनेतून वळते केले जातील.’‘महायुती सरकारने सौर ऊर्जा पंप योजना आणली आहे. या योजनेतून सुमारे आठ लाख आठ हजार शेतकऱ्यांना सौर पंप देण्यात आले आहेत. या योजनेसाठी २४ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. पंतप्रधान सूर्यगृह योजनेंतर्गत आतापर्यंत एक लाख ३० हजार घरांसाठी ५०० मेगावॉटपेक्षा जास्त क्षमतेचे छतावरील सौर ऊर्जा संच दिले आहेत.

### बारामतीसाठी एक हजार कोटींची कामे

या योजनेसाठी १ हजार कोटींपेक्षा जास्त अनुदान लाभार्थ्यांना देण्यात आले आहे,’ असे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.अलीकडे बारामतीकरांना विकासकामे म्हणजे चुटकीसरशी वाटतात. मला वर्षाला पाच कोटी रुपये आमदार निधी मिळतो. म्हणजे पाच वर्षांत २५ कोटी मिळतात. तरीही शंभर दिवसांत बारामतीसाठी एक हजार कोटी रुपयांची कामे मंजूर केली आहेत.

# आरटीओचे दुर्लक्ष, खासगी बसचे भाडे दामदुपट्ट

# जुन्या नव्यांचा समतोल राखून संघटन मजबूत करणार- शत्रुघ्न काटे

## बसच्या मनमानी भाड्यामुळे प्रवाशांच्या खिशाला चाट

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

सुट्ट्यांचा हंगाम सुरु झाला की, नागरिकांना मूळ गावी जाण्याचे किंवा नातेवाईकांना भेटण्यासाठी अथवा पर्यटनाला जाण्याचे वेध लागतात. ह्या काळात रेल्वेला असलेली गर्दी, प्रतीक्षा यादी बघता सामान्य नागरिक हा खासगी प्रवासी बसद्वारे प्रवासाला प्राधान्य देतो. मात्र ,नेमकी प्रवाश्यांची ही गरज ओळखून खासगी बस मालकांनी प्रचंड भाडेवाढ केली आहे. यातून ग्राहकांची [illegible]णे लूटमार सुरु [illegible]



### सरकारच्या कमाल दराकडे दुर्लक्ष

खासगी प्रवासी बसला एसटी बसच्या प्रतिकिलोमीटर भाडेदाच्या दीडपट भाडे आकारता येते. याबाबतचे कमाल भाडे सरकारने निश्चित केले आहे. हे दीडपट दर केवळ उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत असतात. काही खासगी प्रवासी बस सणासुदीच्या व गर्दीच्या हंगामामध्ये प्रवाशांकडून मनमानी भाडे आकारतात. मात्र, जास्त भाडे आकारणाऱ्या खासगी बसवर आरटीओ आणि वाहतूक पोलिसांकडून कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे खासगी आराम बस चालकांच्या मनमानीत वाढ होत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बसमालकांवर आरटीओने कारवाई करणे गरजेचे आहे.

- काटे यांनी स्वीकारला पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्षपदाचा पदभार

- पंधरा दिवसांत नवीन कार्यकारिणी जाहीर करणार*

पिंपरी-चिंचवड : [illegible] आगामी महापालिका निवडणुका ताकदीने लढवल्या जातील. पक्षात कोणाचीही नाराजी नाही. शहरातील आमदार आणि माजी पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संघटना काम करेल. पक्षात दूजाभाव होणार नाही याची दक्षता घेऊन पुढील [illegible] दिवसांच्या कालावधीत [illegible] जाईल," असे भाजपा [illegible]नियुक्त शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे म्हणाले.

भारतीय जनता पार्टीच्या पिंपरी-चिंचवड शहराध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर शत्रुघ्न (बापू) काटे यांनी गुरुवारी अधिकृतपणे शहराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला. मोरवाडी येथील [illegible] झालेल्या समारंभात, पिंपरी चिंचवड जिल्हा निवडणूक निरीक्षक आमदार सिद्धार्थ शिरोळे यांच्या हस्ते मावळते शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्याकडून त्यांनी हे पद स्वीकारले.

यावेळी शत्रुघ्न काटे म्हणाले, पक्षाने सोपवलेल्या जबाबदारीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. "पक्षाने माझ्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र [illegible] प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण तसेच चंद्रकांत दादा पाटील यांच्या नेतृत्वात तसेच मावळते शहराध्यक्ष तथा आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, आमदार अमित गोरखे, आमदार उमाताई खापरे यांच्या मार्गदर्शनाखाली संघटना अधिक मजबूत करण्यावर भर राहील. शहरातील 4500 सक्रिय सदस्य आणि 3 लाख [illegible] सहकार्याने [illegible] काम करणार [illegible]

# बचत गटांच्या महिलांकडून मालमत्ता कर बिलांचे वाटप!

## मालमत्ताधारकांनी सहकार्य करावे : पिंपरी-चिंचवड पालिका प्रशासनाचे आवाहन

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने २०२५-२६ या आर्थिक वर्षातही महिला बचत गटाच्या मार्फत बिलांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. तरी बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.



पिंपरी-चिंचवड शहरात ६ लाख १५ हजार ८६३ नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यानुसार सर्व बिलांची छपाई होऊन बिले वाटप करण्यास सुरुवात झाली आहे. महिला बचत गटातील महिलांच्या माध्यमातून मिळकतकर बिले घरोघरी पोहोचवण्याची जबाबदारी महानगरपालिकेने महिला आर्थिक विकास महामंडळावर सोपवली आहे. बिल वाटप करण्यात येणाऱ्या महिलांना महानगरपालिकेच्या वतीने ओळखपत्र ही देण्यात आले आहे. ३१ मे पर्यंत सर्व बिलांचे वितरण करण्याचे नियोजन महानगरपालिकेने केले आहे. तरी नागरिकांनीही बिल वाटप करण्यासाठी

> बचत गटांच्या महिलांमार्फत मालमत्ता कर बिलांचे वाटप सुरू झाले आहे. यामुळे बचत गटांच्या महिलांच्या आर्थिक सक्षमतेस बळकटी मिळणार आहे. तसेच नागरिकांपर्यंत वेळेवर बिले पोहोचवण्याच्या उद्देशालाही चालना मिळणार आहे. नागरिकांनी देखील बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> पिंपरी चिंचवड महानगरपालिका मालमत्ता कर विभागाचे बिल वाटप महिला बचत गटांच्या महिलांमार्फत करण्यात येत आहे. ३० जून २०२५ पर्यंत कर भरल्यास मालमत्ताधारकांना विविध सवलतींचा लाभ घेता येणार आहे. तरी जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी लवकरात लवकर कर भरून सवलतींचा लाभ घ्यावा.
>
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.




# भाजपचे नवे वाचाळवीर!



**भाजपच्या 'हिंदुत्वाची प्रयोगशाळा' मानल्या गेलेल्या मध्य प्रदेशमधून आदिवासी कल्याण कार्यमंत्र्याच्या रुपात आता एक नवा वाचाळवीर 'अवतरला'आहे. केंद्रात दहा वर्षांहून अधिक सत्ता राबवल्यानंतर तरी भाजपच्या नेत्यांमध्ये परिपक्वता यावी, शहाणपण यावे अशी थोडी जरी कोणी अपेक्षा बाळगली तर त्यांचा भ्रमनिरास झालाच म्हणून समजा.**

मध्य प्रदेशमधील हे वाचाळमंत्री आहेत विजय शहा. खरेतर शहांचे काही चुकले नाही, त्यांनी फक्त भाजपच्या वरिष्ठ नेत्यांचे अनुकरण केले. मुस्लीम आणि महिला यांच्याबद्दल तोंडाला येईल ते आणि मनात येईल तेव्हा बरळण्याची सवय भाजपमधील काही वरिष्ठ नेत्यांना असल्याची अनेक उदाहरणे आहेत. पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख आणि राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची 'दीदी ओ दीदी' अशी हेल काढून टवाळी कोणी केली होती हे सांगण्याची गरज नाही. उत्तर प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीमध्ये 'आम्ही ८० टक्के, ते २० टक्के' असे कोणी म्हटले होते हेही सांगण्याची गरज नाही. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत 'बटेंगे तो कटेंगे' असे कोण म्हणाले होते, आजही विसरले गेलेले नाही. मुस्लिमांबद्दल काहीही बोलले तरी चालते हे भाजपच्या बड्या आणि वाचाळवीरांमध्ये अग्रणी असलेल्या नेत्यांकडून विजय शहा शिकले असतील तर दोष त्यांना कसा देणार? कुठल्याही समाजात 'राजापेक्षा राजनिष्ठ' अशी एक जमात असते, ती राजनिष्ठा सातत्याने दाखवून देते. त्यात आपण कमी तर पडत नाही ना, याची धुगधुगी सतत त्यांच्या मनात असते. मग, जिथे संधी मिळेल तिथे ते वाचाळपणा करून आपली निष्ठा राजाच्या चरणी वाहतात. विजय शहांनी यापेक्षा काही वेगळे केलेले नाही. भाजपचे मंत्री विजय शहा वाचाळपणा करून निसटले असते पण, उच्च न्यायालयाने स्वत:च त्यांच्या बेमुर्वतखोरीची दखल घेतली आणि पोलिसांना बजावले की, असतील हे मंत्री पण, त्यांच्या कृत्याबद्दल गुन्हा दाखल करा! भाजप नेत्यांच्या वाचाळपणाची देशाला सवय झाली असल्याने न्यायालयाचे विजय शहांकडे दुर्लक्षही झाले असते. पण, विजय शहांनी वाचाळपणाचा कडेलोट केला. असा प्रकार त्यांच्या राष्ट्रीय नेत्यांनीही केला नव्हता. संरक्षण दलातील अधिकाऱ्याविषयी तेही महिलेबद्दल विजय शहांनी वापरलेली अभद्र भाषा न्यायालयालाच काय भाजपच्या नेत्यांनाही रुचणारी नव्हती. या मंत्र्याने लष्करी अधिकारी सोफिया कुरेशी यांना 'दहशतवाद्यांच्या बहिणी'ची उपमा दिली. सोफिया कुरेशी यांनी पाकिस्तानविरोधातील 'ऑपरेशन सिंदूर'ची पत्रकार परिषदेत माहिती दिली होती. केंद्र सरकारने मुस्लीम महिला अधिकाऱ्याला म्हणजे मुस्लीम दहशतवाद्यांच्या बहिणीला, भारताने केलेल्या दहशतवादविरोधी कारवाईची माहिती देण्यासाठी पाठवून 'जशास तसे' प्रत्युत्तर दिल्याचा दावा या मंत्र्यांनी केला. ही आक्षेपार्ह भाषा महिलेचा अपमान करते, मुस्लीम धर्माबद्दल रक्तात भिनलेला द्वेष दाखवते. इतकेच नव्हे तर, संरक्षण दलाची मानहानी करते. भाजपमंत्री विजय शहा वाचाळ असतील पण, ते मूर्ख नव्हेत. त्यांना संरक्षण दलातील मुस्लीम महिला अधिकाऱ्यावर निकृष्ट टिप्पणी करण्याची मुभा कोणी दिली? त्यांना पक्षातील कोणाचा आशीर्वाद होता का? शहांची भाषा ही भाजपचे अधिकृत राजकीय धोरण आहे का? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजेत. पश्चातबुद्धी म्हणून शहांची मंत्रीपदावरून हकालपट्टी केलीही जाईल पण, त्यातून काहीही साध्य होणार नाही. उच्च न्यायालयाने बजावूनदेखील पोलिसांनी शहांविरोधात दाखल केलेल्या गुन्ह्यामध्ये जाणूनबुजून पळवाटा ठेवल्या. हे लक्षात घेता न्यायालयात कोणी आव्हान दिले तर हा गुन्हा टिकणारच नाही, अशी पोलिसांची कानउघाडणी उच्च न्यायालयाने केली आहे. म्हणजे मध्य प्रदेशमधील सरकारी यंत्रणा मंत्र्याला वाचवण्यासाठी धडपड करताना दिसली. या मंत्र्याने आता कुरेशी यांची माफी मागितली आहे. माझे चुकले, मी दहा वेळा माफी मागायला तयार आहे, असा कांगावा करत त्यांनी स्वत:चा बचाव करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण, देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला गेला आणि त्यात पळवाटा नसतील तर विजय शहांचे मंत्रीपद जाईलच, शिवाय दोषी ठरले तर तुरुंगवास भोगावा लागेल. केंद्रात भाजपची सत्ता आल्यापासून भाजपच्या कोणी कारावास भोगला आहे असे फारसे पाहायला मिळालेले नाही.

## प्रासंगिक »

# कोणासाठी?

***कचराभूमीचीच जागा हवी, तर तिचे सपाटीकरण पालिकेने न करता प्राधिकरणानेच करण्याची अट सरकारला घालता आली असती...***

उद्योगवाढ, त्यातून होणारी रोजगारनिर्मिती, आसपासच्या परिसराचा होणारा विकास यासाठी सरकारी यंत्रणेने उद्योगांना साह्य करणारी धोरणे राबवणे स्वाभाविक असते. उदारीकरणाच्या धोरणानंतर खासगीकरणाचे वारे देशात वाहू लागले आणि विविध क्षेत्रांमध्ये खासगीकरणाला प्रोत्साहन देताना खासगी उद्योगांना मदत होईल, अशी धोरणे सरकारने आखणेही नित्याचे ठरले. त्याचे काही चांगले परिणामही जाणवले. विशेषत: पायाभूत सुविधा क्षेत्रात खासगीकरणाने आमूलाग्र बदल झाले. तेव्हा काही ठरावीक उद्योगपतींनाच मदत होईल, अशी सरकारची वेळोवेळी भूमिका असल्याची टीकाही होऊ लागली आणि टूजी घोटाळा आदी प्रकरणांत ती टिपेला गेली. टीकेचा हा बार पुढे न्यायालयांत फुसका ठरण्याआधी राजकीय परिणाम झालाच. सरकार बदलले.

'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने धुरळा अजून स्थिरावलेला नाही. पण दरम्यानच्या काळात भारताचा आणखी एक सामरिक प्रतिस्पर्धी चीनने वेगळ्या स्वरूपाची कुरापत काढलेली आहे. अरुणाचल प्रदेश या भारताच्या राज्यातील काही भागांना चिनी नावे देण्याचे प्रकार त्या देशाकडून सुरूच आहेत.

# एक पाऊल मागे घेण्याची आवश्यकता नाही



याबाबत परराष्ट्र खात्याने तीव्र शब्दांत नापसंती व्यक्त केली. 'कल्पक नावे दिल्याने अरुणाचल प्रदेशाचे वास्तव बदलता येणार नाही. हे राज्य भारताचा अविभाज्य भाग होते, आहे नि राहील. असले चिथावणीखोर प्रकार टाळलेले बरे', असे विधान परराष्ट्र खात्याच्या वतीने जारी करण्यात आले. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर मागे याविषयी म्हणाले होते की, मी तुमच्या घराचे नाव बदलले तर ते माझे होते का? चीनने पुन:पुन्हा नावे बदलण्याचा उद्योग चालवला आहे. पण असे केल्याने अरुणाचलचे वास्तव बदलत नाही. 'पुन:पुन्हा' असे करण्याची चीनचे खोड अद्याप जिरलेली नाही. २०१७ मध्ये ही मालिका सुरू झाली. त्या वेळी अरुणाचलमधील सहा स्थानांची चिनी नावे जारी करण्यात आली. २०२१ मध्ये आणखी १५ जागांचे 'चिनी बारसे' झाले. एप्रिल २०२३ मध्ये ११ स्थानांना चिनी नावे देण्यात आली. ताज्या स्थानांच्या संख्येचा तपशील उपलब्ध नाही. अरुणाचल प्रदेशाला चीन 'झांगनान' असे संबोधतो. चिनी राज्यकर्ते या भारतीय राज्याला दक्षिण तिबेटचा विस्तार मानतात नि त्यातील जवळपास ९० हजार चौरस किलोमीटर भूभागावर आपला दावा सांगतात. आधीच्या नामांतरांच्या वेळी काही घटना अशा घडल्या, ज्यांविषयी नापसंती व्यक्त करण्यासाठी चीनने अरुणाचलचा विषय उकरून काढला होता. २०१७ मध्ये दलाई लामांनी अरुणाचलमधील तवांगला भेट दिली होती. २०२१ मध्ये चीनने सीमांच्या आरेखनाबाबत नवा कायदा बनवला. २०२३ मध्ये जी-ट्वेंटी परिषदेअंतर्गत सदस्य देशांच्या प्रतिनिधींनी अरुणाचलची राजधानी इटानगरला भेट दिली होती. नव्या नामांतराचे कारण स्पष्ट नाही. पण भारत आणि पाकिस्तानदरम्यान ताज्या संघर्षाकडून भारताचे लक्ष इतरत्र वळावे, ही नीती असू शकते.वास्तविक अशा प्रकारे भारत-चीन संबंधांमध्ये एक पाऊल मागे घेण्याची काहीच आवश्यकता नाही. २०२० मधील गलवान संघर्षानंतर दोन देशांदरम्यान निर्माण झालेली कटुता आता बऱ्यापैकी कमी झालेली आहे. गेल्या वर्षी लडाख टापूतील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील देम्चोक आणि देप्सांग या शेवटच्या दोन ठिकाणांहून सैन्यमाघारीबाबत आणि येथील गस्तीबिंदू निर्लष्करी करण्याबाबत मतैक्य झाले. त्यानंतर काही दिवसांनीच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांची रशियात भेट झाली आणि तीत सर्व वादग्रस्त मुद्द्यांवर चर्चेने तोडगा काढण्याविषयी ठरवण्यात आले. कैलाश मानसरोवर यात्रा जवळपास पाच वर्षांनी पुन्हा सुरू करण्याविषयी चीन राजी झाला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.


# आम्ही सेटिंगचे राजकारण करणार नाही!

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरेंचं मोठं विधान

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महानगरपालिकेच्या निवडणुका जवळ येत असताना राज्यात पुन्हा एकदा राजकीय घडामोडींना वेग येताना दिसून येत आहे. मनसेचे पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी अभिनेते महेश मांजरेकर यांच्या यूट्यूब वाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये महाराष्ट्र हितासाठी सर्वांनी एकत्र येण्याची साद घातली होती. उद्धव ठाकरेंनी या आवाहनाला प्रतिसाद दिला होता. मात्र या संभाव्य युतीवर पुढे ठोस अशी चर्चा होताना दिसली नाही. आता पुन्हा एकदा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या चर्चांना उधाण आले आहे. शिवसेनेचे (ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी नुकतेच या विषयावर भाष्य केले.**





छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर असताना आदित्य ठाकरेंनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी विविध विषयांवर त्यांनी आपले मत व्यक्त केले. ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चेवरही त्यांना प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर ते म्हणाले, “उद्धव साहेबांनी प्रतिसाद दिला होता. महाराष्ट्र हितासाठी जे कुणी स्वच्छ मनाने पुढे येतील, त्यांना घेऊन पुढे जाण्यासाठी आम्ही तयार आहोत. हे उद्धव साहेबांनी सांगितले होते.”आदित्य ठाकरे पुढे म्हणाले, “साद-प्रतिसाद, टाळी, दुसरी टाळी हे सर्व चालूच असते. पण आम्ही महाराष्ट्राच्या हिताचे बोलत आहोत. आम्ही कुठेही सेटिंगचे राजकारण करणार नाही. आम्ही स्वच्छ दिलाने पुढे येत आहोत. जे कुणी आमच्याबरोबर येतील त्यांना घेऊन पुढे जाऊ. हे कोणत्याही एका पक्षाबाबत बोलत नाही.”महाराष्ट्राच्या राजकारणाबाबत बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की, राज्याची अवस्था आज बिकट झाली आहे. निवडणुकीपूर्वी जी वचने दिली होती. ती पूर्ण केलेली नाहीत. सरकारमधील तीनही पक्षांमध्ये वाद सुरू आहेत. हे वाद जनतेसाठी नसून कुणाला बंगला, कुणाला पालकमंत्री हवे आहे, यासाठी वाद सुरू आहे. महाराष्ट्र हिताची एकही गोष्ट तीनही पक्षाचे नेते बोलत नाहीत, असा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला.छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर असताना आदित्य ठाकरेंनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी विविध विषयांवर त्यांनी आपले मत व्यक्त केले. ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चेवरही त्यांना प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर ते म्हणाले, “उद्धव साहेबांनी प्रतिसाद दिला होता. महाराष्ट्र हितासाठी जे कुणी स्वच्छ मनाने पुढे येतील, त्यांना घेऊन पुढे जाण्यासाठी आम्ही तयार आहोत. हे उद्धव साहेबांनी सांगितले होते.”आदित्य ठाकरे पुढे म्हणाले, “साद-प्रतिसाद, टाळी, दुसरी टाळी हे सर्व चालूच असते. पण आम्ही महाराष्ट्राच्या हिताचे बोलत आहोत. आम्ही कुठेही सेटिंगचे राजकारण करणार नाही. आम्ही स्वच्छ दिलाने पुढे येत आहोत. जे कुणी आमच्याबरोबर येतील त्यांना घेऊन पुढे जाऊ. हे कोणत्याही एका पक्षाबाबत बोलत नाही.”महाराष्ट्राच्या राजकारणाबाबत बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की, राज्याची अवस्था आज बिकट झाली आहे. निवडणुकीपूर्वी जी वचने दिली होती. ती पूर्ण केलेली नाहीत. सरकारमधील तीनही पक्षांमध्ये वाद सुरू आहेत. हे वाद जनतेसाठी नसून कुणाला बंगला, कुणाला पालकमंत्री हवे आहे, यासाठी वाद सुरू आहे. महाराष्ट्र हिताची एकही गोष्ट तीनही पक्षाचे नेते बोलत नाहीत, असा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला. महानगरपालिकेच्या निवडणुका जवळ येत असताना राज्यात पुन्हा एकदा राजकीय घडामोडींना वेग येताना दिसून येत आहे. मनसेचे पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी अभिनेते महेश मांजरेकर यांच्या यूट्यूब वाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये महाराष्ट्र हितासाठी सर्वांनी एकत्र येण्याची साद घातली होती. उद्धव ठाकरेंनी या आवाहनाला प्रतिसाद दिला.

### पुढे जाण्यासाठी आम्ही तयार

होता. मात्र या संभाव्य युतीवर पुढे ठोस अशी चर्चा होताना दिसली नाही. आता पुन्हा एकदा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या चर्चांना उधाण आले आहे. शिवसेनेचे (ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी नुकतेच या विषयावर भाष्य केले.छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर असताना आदित्य ठाकरेंनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी विविध विषयांवर त्यांनी आपले मत व्यक्त केले. ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चेवरही त्यांना प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर ते म्हणाले, “उद्धव साहेबांनी प्रतिसाद दिला होता. महाराष्ट्र हितासाठी जे कुणी स्वच्छ मनाने पुढे येतील, त्यांना घेऊन पुढे जाण्यासाठी आम्ही तयार आहोत.

# माझं बालवाङ्मय वाचायचं वय राहिलं नाही

## राऊतांच्या पुस्तकावर मुख्यमंत्री फडणवीसांचा खोचक टोला

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शिवसेनेचे (ठाकरे) खासदार व प्रवक्ते संजय राऊत यांच्या ‘नरकातला स्वर्ग’ या पुस्तकाचं उद्या (शनिवार, १७ मे) मुंबईत प्रकाशन होणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक व चित्रपट पटकथालेखक जावेद अख्तर यांच्या हस्ते या पुस्तकाचं प्रकाशन केलं जाणार आहे. शिवसेना (ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे प्रमुख तथा ज्येष्ठ नेते शरद पवार व तृणमूल काँग्रेसचे खासदार साकेत गोखले यांच्या उपस्थितीत हे पुस्तक प्रकाशित केलं जाईल.**

या पुस्तकाच्या प्रकाशनापूर्वीच यामधील मजकुरावरून, राऊतांनी केलेल्या काही दाव्यांवरून मोठा राजकीय गोंधळ सुरू झाला आहे. यावर वेगवेगळ्या राजकीय प्रतिक्रिया देखील येत आहेत. दरम्यान, प्रसारमध्यमांच्या प्रतिनिधींनी या पुस्तकातील मजकुराबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रतिक्रिया विचारली असता, “मी बालवाङ्मय (बालसाहित्य) वाचत नाही”, अशी खोचक टिप्पणी केली. संजय राऊतांच्या ‘नरकातला स्वर्ग’ या पुस्तकात ‘राजा का संदेश साफ है’ नावाचं एक प्रकरण असल्याचा दावा काही प्रसारमाध्यमांनी केला आहे.






गुजरात दंगलीसह काही गुन्ह्यांच्या प्रकरणात अमित शाह अडकलेले असताना शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांनी शाह यांना कसं वाचवलं आणि दोघांमधील कथित भेटीबद्दल सविस्तर लेखण केलं आहे. यावरून मोठं राजकीय वादळ उठलं आहे. याबाबत काही वार्ताहरांनी फडणवीस यांना प्रतिक्रिया विचारली. त्यावर फडणवीस म्हणाले, “मी कादंबऱ्या वाचणं कधीच सोडून दिलं आहे. कथा-कादंबऱ्या आणि बालवाङ्मय वाचायचं माझं वय राहिलेलं नाही. असल्या गोष्टी मी वाचत नाही. तुम्ही प्रसारमाध्यमांनी त्यांना (संजय राऊत) सोडून द्या, ते कोणी मोठे नेते नाहीत”.

संजय राऊत यांना २०२२ मध्ये पत्राचाळ पुनर्विकास प्रकरणाशी संबंधित मनी लॉन्डरिंग प्रकरणात अटक करण्यात आली होती. ते १०१ दिवस ईडीच्या कोठडीत (आर्थर रोड तुरुंग) होते. या काळात तुरुंगातील अनुभवांबद्दल राऊत यांनी ‘नरकातला स्वर्ग’ हे पुस्तक लिहिलं असून ते शनिवारी प्रकाशित केलं जाणार आहे. असं वक्तव्य भाजपा नेत्या चित्रा वाघ यांनी केलं आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनापूर्वीच यामधील मजकुरावरून, राऊतांनी केलेल्या काही दाव्यांवरून मोठा राजकीय गोंधळ सुरू झाला आहे.

### कादंबऱ्या वाचणं कधीच सोडून दिलं

यावर वेगवेगळ्या राजकीय प्रतिक्रिया देखील येत आहेत.दरम्यान, प्रसारमध्यमांच्या प्रतिनिधींनी या पुस्तकातील मजकुराबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रतिक्रिया विचारली असता, “मी बालवाङ्मय (बालसाहित्य) वाचत नाही”, अशी खोचक टिप्पणी केली.संजय राऊतांच्या ‘नरकातला स्वर्ग’ या पुस्तकात ‘राजा का संदेश साफ है’ नावाचं एक प्रकरण असल्याचा दावा काही प्रसारमाध्यमांनी केला आहे. गुजरात दंगलीसह काही गुन्ह्यांच्या प्रकरणात अमित शाह अडकलेले असताना शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांनी शाह यांना कसं वाचवलं आणि दोघांमधील कथित भेटीबद्दल सविस्तर लेखण केलं आहे. यावरून मोठं राजकीय वादळ उठलं आहे. याबाबत काही वार्ताहरांनी फडणवीस यांना प्रतिक्रिया विचारली. त्यावर फडणवीस म्हणाले, “मी कादंबऱ्या वाचणं कधीच सोडून दिलं आहे.

# डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा काढलं 'टॅरिफ' अस्त्र!

## ट्रम्प यांनी केले अनेक देशांवर मोठ्या व्यापार शुल्क लागू

**। नवी दिल्ली ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केले आहे की, ते लवकरच व्यापार भागीदार असलेल्या देशांसाठी नवीन एकतर्फी व्यापार लागू करणार आहेत. याचबरोबर ज्या भागीदार देशांवर व्यापार शुल्क लागू करण्यात येणार आहे, त्यांना, "अमेरिकेत व्यवसाय करण्यासाठी किती पैसे द्यावे लागतील", याचेही स्पष्टीकरण देणार असल्याचे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे.**



शुक्रवारी संयुक्त अरब अमिरातीतील त्यांच्या दौऱ्यादरम्यान उद्योगपतींशी झालेल्या बैठकीत बोलताना ट्रम्प म्हणाले, "आमच्याशी एकाच वेळी १५० देश करार करू इच्छित आहेत, परंतु आम्ही इतक्या देशांकडे लक्ष देऊ शकत नाही. आमच्याशी भेटू इच्छिणाऱ्या सर्वांशी चर्चा करणे शक्य नाही", असे वृत्त द गार्डियनने दिले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितेल की, कोषागार सचिव स्कॉट बेसेंट आणि वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांच्याकडे काही देशांना पत्राद्वारे नवीन व्यापार शुल्काची माहिती देण्याचे काम सोपवले जाईल. "पुढील दोन किंवा तीन आठवड्यांत एका विशिष्ट टप्प्यावर, मला वाटते की स्कॉट आणि हॉवर्ड संबंधित देशांना पत्रे पाठवून, अमेरिकेत व्यवसाय करण्यासाठी किती पैसे द्यावे लागतल याची माहिती देतील."तत्पूर्वी एप्रिलच्या सुरुवातीला डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक देशांवर मोठ्या व्यापार शुल्क लागू केले होते, जे नंतर ९० दिवसांसाठी स्थिगित करण्यात आले होते.

केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्या नेतृत्वाखालील एक भारतीय व्यापार शिष्टमंडळ पुढील आठवड्यात दोन्ही देशांमधील अंतरिम व्यापार कराराच्या रूपरेषांना अंतिम स्वरूप देण्यासाठी अमेरिकेला जाणार आहे, असे एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने गुरुवारी सांगितले. याबाबत इंडियन एक्सप्रेसने वृत्त दिले आहे.गेल्या काही दिवसांमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात तणावाचे वातावरण आहे. भारताने पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर कारवाई केल्यानंतर पाकिस्तानने भारतावर हल्ले करण्याचे अयशस्वी प्रयत्न केले. त्यानंतर ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील शस्त्रविरामाची एक्सवरून घोषणा केली होती. याचबरोबर त्यांनी काश्मीर बाबतही वक्तव्य केले होते. ज्यावरून त्यांच्यावर जोरदार टीका झाली होती. पुढे काही दिवसांनी त्यांनी, भारत आणि पाकिस्तान यांच्यात मध्यस्थी केली नसून, त्यांना शस्त्रविरामासाठी मदत केल्याचे विधान केले आहे.शुक्रवारी संयुक्त अरब अमिरातीतील त्यांच्या दौऱ्यादरम्यान उद्योगपतींशी झालेल्या बैठकीत बोलताना ट्रम्प म्हणाले, "आमच्याशी एकाच वेळी १५० देश करार करू इच्छित आहेत, परंतु आम्ही इतक्या देशांकडे लक्ष देऊ शकत नाही. आमच्याशी भेटू इच्छिणाऱ्या सर्वांशी चर्चा करणे शक्य नाही", असे वृत्त द गार्डियनने दिले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितेल की, कोषागार सचिव स्कॉट बेसेंट आणि वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांच्याकडे काही देशांना पत्राद्वारे नवीन व्यापार शुल्काची माहिती देण्याचे काम सोपवले जाईल. "पुढील दोन किंवा तीन आठवड्यांत एका विशिष्ट टप्प्यावर, मला वाटते की स्कॉट आणि हॉवर्ड संबंधित देशांना पत्रे पाठवून, अमेरिकेत व्यवसाय करण्यासाठी किती पैसे द्यावे लागतल याची माहिती देतील."तत्पूर्वी एप्रिलच्या सुरुवातीला डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक देशांवर मोठ्या व्यापार शुल्क लागू केले होते, जे नंतर ९० दिवसांसाठी स्थिगित करण्यात आले होते.

### 90 दिवसांसाठी शुल्क स्थिगित

केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्या नेतृत्वाखालील एक भारतीय व्यापार शिष्टमंडळ पुढील आठवड्यात दोन्ही देशांमधील अंतरिम व्यापार कराराच्या रूपरेषांना अंतिम स्वरूप देण्यासाठी अमेरिकेला जाणार आहे, असे एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने गुरुवारी सांगितले. याबाबत इंडियन एक्सप्रेसने वृत्त दिले आहे. गेल्या काही दिवसांमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात तणावाचे वातावरण आहे. भारताने पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर कारवाई केल्यानंतर पाकिस्तानने भारतावर हल्ले करण्याचे अयशस्वी प्रयत्न केले. त्यानंतर ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील शस्त्रविरामाची एक्सवरून घोषणा केली होती.

# डोनाल्ड ट्रम्प यांना जीवे मारण्याची धमकी?

## एफबीआयचे माजी संचालकांची पोस्ट, 8647 क्रमांकाचा अर्थ काय?

**। नवी दिल्ली ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**अमेरिकेच्या फेडरल ब्युरो ऑफ इनव्हेस्टीगेशनचे (FBI) माजी संचालक जेम्स कोमी यांच्या एका इन्स्टाग्राम पोस्टमुळे अमेरिकेत वाद निर्माण झाला आहे. समुद्रकिनारी शिंपल्याच्या सहाय्याने ८६४७ हा क्रमांक तयार करण्यात आल्याचा एक फोटो कोमी यांनी शेअर केला होता. डोनाल्ड ट्रम्प यांना संपविणे हा या क्रमांकाचा संकेत असू शकतो, असा कयास अनेक सोशल मीडिया युजर्सनी लावला आहे.**






डोनाल्ड ट्रम्प यांनी २०१७ साली जेम्स कोमी यांची एफबीआयमधून हकालपट्टी केली होती. जेम्स कोमी यांच्या पोस्टवर वाद निर्माण झाल्यानंतर त्यांनी सदर फोटो डिलीट केला आहे. तसेच त्यांनी एक निवेदन प्रसिद्ध करत सदर फोटो पोस्ट करण्यामागे कोणताही इतर हेतू नसल्याचे स्पष्ट केले आहे.इन्स्टाग्रामवरील नव्या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले, "मी सकाळी समुद्रकिनारी फेरफटका मारत असताना मला काही शिंपले किनाऱ्यावर आढळून आले. त्याचा फोटो मी शेअर केला आणि त्यातून राजकीय संदेश दिला जात असल्याचा अंदाज बांधला गेला. काहींना या क्रमांकाचा संबंध हिंसाचाराशी लावला. मी हिंसाचाराचा विरोध करतो, त्यामुळे ही पोस्ट डिलीट केली आहे."अमेरिकेत ८६ या क्रमाकांचा विशिष्ट अर्थ आहे. ज्याचा अर्थ होतो काढून टाकणे, संपविणे किंवा हटविणे. दरम्यान ४७ चा अर्थ काहींनी डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी लावला. ट्रम्प अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष आहे. यावरून ४७ व्या राष्ट्राध्यक्षाला बाजूला करा, असा या क्रमाकांचा अर्थ लावला गेला. दरम्यान आता जेम्स कोमी यांच्यावर ट्रम्प यांचे सहकारी आणि कुटुंबिय टीका करत आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांच्या मुलाने म्हटले की, माझ्या वडिलांना मारून टाका, असे जेम्स कोमी सहज बोलून गेले. डेमोक्रेटिक पक्ष आणि माध्यमांमधील लोकांचे हे षडयंत्र आहे.डोनाल्ड ट्रम्प यांच्या सहकारी लॉरा लूमर यांनीही जेम्स कोमी यांच्यावर जोरदार टीका केली आहे. त्यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले.

### पोस्टची चौकशी होणार

एफबीआयचे माजी संचालक जेम्स कोमी यांनी इन्स्टाग्रामवर केलेल्या पोस्टमध्ये ८६४७ या क्रमांकांचा उल्लेख केला. यावरून त्यांनी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना मारण्याची धमकी दिली आहे. होमलँड सिक्युरिटीच्या सचिव क्रिस्टी नोएम यांनी सांगितले की, गुप्त वार्ता विभाग आणि डीएचएस कडून जेम्स कोमी यांच्या पोस्टची चौकशी केली जात आहे.डोनाल्ड ट्रम्प यांनी २०१७ साली जेम्स कोमी यांची एफबीआयमधून हकालपट्टी केली होती. जेम्स कोमी यांच्या पोस्टवर वाद निर्माण झाल्यानंतर त्यांनी सदर फोटो डिलीट केला आहे. तसेच त्यांनी एक निवेदन प्रसिद्ध करत सदर फोटो पोस्ट करण्यामागे कोणताही इतर हेतू नसल्याचे स्पष्ट केले आहे. इन्स्टाग्रामवरील नव्या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले.

# विजय राज यांची लैंगिक छळ प्रकरणातून निर्दोष मुक्तता

अभिनेते विजय राज यांची लैंगिक छळाच्या आरोपांमधून निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. विजय राज 'स्त्री', 'डेल्ही बेली', 'डेढ इश्किया', 'गली बॉय' यांसारख्या चित्रपटांमधील कामासाठी ओळखले जातात. विद्या बालनच्या 'शेरनी' चित्रपटाच्या सेटवर एका सहकाऱ्याने विजय राज यांच्यावर लैंगिक छळाचे आरोप केले होते, या आरोपांतून त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. गोंदिया मॅजिस्ट्रेट कोर्टाने विजय राज यांच्यावरील सर्व आरोप रद्द केले आहेत. विजय यांच्या वकील सवीना बेदी सच्चर यांनी दिलेल्या माहितीनुसार, नागपूरजवळ 'शेरनी' चित्रपटाचे चित्रीकरण सुरू होते. पण या आरोपांमुळे विजय राज यांना चित्रपटाचे चित्रीकरण अर्ध्यावर सोडावे लागले, इतकंच नाही तर नंतर कामही गेलं. पण आता ते निर्दोष असल्याचा निकाल कोर्टाने दिला आहे. आरोप लावल्यानंतर संबंधित व्यक्तीला दोषी ठरवणाऱ्या लोकांसाठी हे एक उदाहरण ठरेल, अशी आशा आहे, असं सवीना म्हणाल्या. इंडिया टुडेने हे वृत्त दिलं आहे.ही घटना ४ नोव्हेंबर २०२० रोजी घडली होती. मध्य प्रदेशातील बालाघाट येथे चित्रपटातील क्रू मेंबर्स एका हॉटेलमध्ये थांबले होते. तिथे एका क्रू मेंबरचा विनयभंग केल्याच्या आरोपावरून विजय राज यांना अटक



करण्यात आली होती. त्याच दिवशी त्यांची जामिनावर सुटका झाली होती. नोव्हेंबर २०२० मध्ये दाखल केलेल्या एफआयआरमध्ये असं म्हटलं होतं की, विजय राजने तिच्या दिसण्याबद्दल टिप्पणी केली होती. तसेच तिच्या संमतीशिवाय तिचा मास्क बदलण्याचा प्रयत्न केला. महिलेने सुरुवातीला आक्षेप घेत वरिष्ठांना या घटनेबद्दल सांगितलं. नंतर तिने रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. आता जवळपास साडेचार वर्षांनंतर या प्रकरणी गोंदिया कोर्टाने निर्णय दिला असून विजय राज यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.'शेरनी' हा चित्रपट २०२१ मध्ये प्राइम व्हिडीओवर रिलीज करण्यात आला होता. त्यानंतर विजय राज यांनी 'गंगुबाई काठियावाडी', 'चंदू चॅम्पियन', 'भूल भुलैया ३' मध्ये काम केलं. ते नुकत्याच आलेल्या 'फतेह'मध्ये झळकले होते. या चित्रपटात सोनू सूदची मुख्य भूमिका होती. दिग्दर्शनही त्यानेच केलं होतं.

## एजाज खान पुन्हा वादात अडकला

अभिनेता एजाज खान मागील काही दिवसांपासून 'हाऊस अरेस्ट' या शोमुळे वादात अडकला आहे. ULLU APP वरील या शोचा होस्ट असलेल्या एजाजने स्पर्धकांना कपडे काढायला सांगितलं होतं, तसेच अश्लील कृत्ये करायला लावली होती. याच शोसंदर्भात एका महिलेने तक्रार दिली आहे. तिने होस्ट एजाज खानवर बलात्काराचा आरोप करत तक्रार नोंदवली आहे. अभिनेता एजाज खानने बलात्कार केल्याचा आरोप एका महिलेने केला आहे. त्याने लग्नाचे आणि त्याच्या 'हाऊस अरेस्ट' या शोमध्ये काम देण्याचे आमिष दाखवून अत्याचार केला,याप्रकरणी मुंबईतील चारकोप पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या शोमध्ये अशील कंटेंट दाखवल्याबद्दल आधीच एजाज खानविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्यानंतर आता या महिलेच्या तक्रारीनंतर एजाज पुन्हा एकदा वादात अडकला आहे.

## जिनिलीयाने सांगितली रितेशची आवड

रितेश व जिनिलीया देशमुख यांच्याकडे मनोरंजन विश्वातील आदर्श जोडपं म्हणून पाहिलं जातं. या दोघांची पहिली भेट 'तुझे मेरी कसम' चित्रपटादरम्यान झाली होती. ओळख, मैत्री अन् त्यानंतर या मैत्रीचं रुपांतर प्रेमात झालं. जवळपास १० वर्षे एकमेकांना डेट केल्यावर रितेश व जिनिलीया यांनी २०१२ मध्ये लग्नगाठ बांधली. या जोडप्याला रियान आणि राहिल अशी दोन मुलं आहेत. रितेश-जिनिलीया सोशल मीडियावर कायम चर्चेत असतात. त्यांचे इन्स्टाग्रामवरील मजेशीर रील्स व्हिडीओ सर्वत्र नेहमीच व्हायरल होत असतात. वैयक्तिक आयुष्यात, रितेश-जिनिलीया शाकाहारी असून त्यांनी काही वर्षांपूर्वी 'इमॅजिन मीट्स' हा प्लान्ट बेस्ड खाद्यपदार्थांचा ब्रँड सुरु करून जीवनशैलीत काही महत्त्वाचे बदल केले.रितेश देशमुख हेल्दी राहण्यासाठी चहा-कॉफीचं सेवन देखील करत नाही. याविषयी जिनिलीयाने 'हॉटरफ्लाय'ला दिलेल्या मुलाखतीत खुलासा केला होता. रितेश आणि जिनिलीयाला सुरुवातीला, "तुम्ही आयुष्यभर कोणता एक पदार्थ खाऊ शकता? असा पदार्थ सांगा ज्याचा तुम्हाला कधीच कंटाळा येणार नाही..." हा प्रश्न विचारण्यात आला. यावर रितेशने वडापाव तर, जिनिलीयाने शेवपुरी मी कधीही खाऊ शकते हे उत्तर दिलं.यानंतर या जोडप्याला "कॉफी की चहा? तुम्हाला काय आवडतं?" हा प्रश्न रॅपिड फायरमध्ये विचारण्यात आला. यावर जिनिलीया म्हणाली, "मी कॉफी पिते. रितेश चहा-कॉपी दोन्ही गोष्टी पीत नाही. तो ग्रीन टी पितो.



## 2.45 तासांचा क्राइम थ्रिलर सिनेमा

अलीकडच्या काळात दाक्षिणात्य चित्रपटांना प्रेक्षकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे. तमिळ व मल्याळम भाषेतील अनेक चित्रपट सत्य घटनेवर आधारित आहेत. असाच एक चित्रपट ४ वर्षांपूर्वी आला होता. हा लीगल ड्रामा चित्रपट तुम्ही आता ओटीटीवर पाहू शकता. चित्रपट हा फक्त मनोरंजनासाठी नाही, समाजात बदल घडवून आणण्यासाठी ते एक शक्तिशाली माध्यम आहे. दक्षिण भारतीय चित्रपटांनी या बाबतीत अनेक दमदार चित्रपट दिले आहेत. कॉमेडी, ॲक्शन, सस्पेन्स थ्रिलर अशा विविध शैलींमध्ये प्रेक्षकांना आकर्षित करणाऱ्या दक्षिण चित्रपटांनी लीगल ड्रामामध्येही आपली खासियत दाखवली आहे.२०२१ मध्ये प्रदर्शित झालेला 'जय भीम' हा एका सत्य घटनेवर आधारित कायदेशीर थ्रिलर चित्रपट आहे. या चित्रपटाने प्रेक्षकांची मनं जिंकली होती. या चित्रपटाने समाजातील वंचित घटकाच्या समस्या जगासमोर मांडल्या होत्या.या चित्रपटात तमिळ सुपरस्टार सूर्याने वकिलाची भूमिका साकारली होती. या चित्रपटातील त्याच्या दमदार अभिनयाचं प्रचंड कौतुक झालं होतं. सूर्याच्या 'जय भीम' चित्रपटाला IMDB वर १० पैकी ८.७ रेटिंग मिळाले आहे. सूर्याने यापूर्वी 'गजनी' आणि 'सिंघम' सारख्या चित्रपटांमध्ये ॲक्शन हिरो म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली होती, परंतु या चित्रपटातील त्याच्या भावनिक अभिनयाने चाहत्यांना आश्चर्यचकित केलं.

## सोनल आता चित्रपटांमध्ये फार दिसत नाही

बॉलीवूडमध्ये असे अनेक स्टार आहेत, ज्यांना बरीच वर्षे संघर्ष करून इंडस्ट्रीत काम मिळवलं. तर काही लोक असे आहेत ज्यांना वर्षानुवर्षे कठोर परिश्रम करूनही यश मिळालं नाही. काही कलाकार तर पहिल्या चित्रपटामुळे रातोरात यशाच्या शिखरावर पोहोचले, पण त्यांचे स्टारडम फार काळ टिकले नाही. आज आम्ही तुम्हाला अशाच एका अभिनेत्रीबरोबर सांगणार आहोत, जिने एकाच चित्रपटात ५-१० नव्हे तर तब्बल ३० किसिंग सीन दिले होते. पण तरीही तिचं करिअर मात्र यशस्वी झालं नाही. आपल्या अभिनय व बोल्डनेसमुळे चर्चेत राहणाऱ्या या अभिनेत्रीचं नाव सोनल चौहान. मागच्या काही वर्षांपासून मोठ्या पडद्यापासून दूर असलेल्या या अभिनेत्रीने बरेच चित्रपट केले आहेत. पण तिला हवं तसं यश मिळालं नाही.उत्तर प्रदेशातील नोएडा येथे जन्मलेल्या सोनल चौहानने २००५ मध्ये मिस वर्ल्ड टुरिझमचा किताब जिंकला. त्यानंतर ती हिमेश रेशमियाच्या 'समझो ना' या गाण्यात दिसली आणि मग तिने हिंदी चित्रपटांमध्ये प्रवेश केला.सोनल चौहानचा पहिला चित्रपट इमरान हाशमीसोबतचा 'जन्नत' होता. जो २००८ मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटामुळे ती रातोरात स्टार बनली. पण त्यानंतर, अभिनेत्रीचा कोणताही चित्रपट मोठ्या पडद्यावर काही कमाल करू शकला नाही. २०१३ मध्ये, ती '३जी – अ किलर कनेक्शन' या चित्रपटात दिसली. या चित्रपटात तिच्यासोबत अभिनेता नील नितीन मुकेश होता.या चित्रपटात सोनल व नितीनने ३० किसिंग सीन दिले होते, पण तरीही चित्रपट बॉक्स ऑफिसवर आदळला होता. चित्रपट फ्लॉप झाल्यावर सोनाल दाक्षिणात्य चित्रपटांकडे वळली. तिथे तिने अनेक मोठ्या स्टार्सबरोबर तिने काम केलं आणि हिट चित्रपट दिले. सोनलने 'बुड्ढा होगा तेरा बाप', 'जॅक अँड दिल', 'द घोस्ट' सारखे चित्रपट केले



# तो मानसिकरित्या खचला : रवी शास्त्री

## कोहलीने कसोटीतून निवृत्ती घेतली? रवी शास्त्रींचा खुलासा

| नवी दिल्ली|
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**रोहित शर्मा पाठोपाठ विराट कोहलीने देखील सर्वांना धक्का देत कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. विराट कोहलीच्या निवृत्तीवरून अजूनही मोठी चर्चा सुरू आहे. विराटच्या निवृत्तीमागचं कारण काय असेल याचे अनेक दावे करणारे रिपोर्ट आपल्या समोर येत आहे. दरम्यान एका रिपोर्टमध्ये असं म्हटलं होतं की, विराट कोहलीने कसोटी निवृत्तीपूर्वी भारताचे माजी कोच रवी शास्त्री यांच्याशी चर्चा केली होती. या चर्चेदरम्यान दोघांमध्ये नेमकं काय बोलणं झालं होतं, याबाबत रवी शास्त्रींनी माहिती दिली आहे.**



विराट कोहलीने १२ मे रोजी कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. त्याने त्याच्या इन्स्टाग्रामवर एक लांबलचक पोस्ट लिहून निवृत्तीची घोषणा केली. कोहली कसोटी क्रिकेट तसेच जागतिक क्रिकेटमधील मोठं नाव आहे. अनेकांनी विराटच्या निवृत्तीबाबत आश्चर्य व्यक्त केलं. कोहली आणि शास्त्री हे भारतीय कसोटी क्रिकेट इतिहासातील सर्वात यशस्वी कर्णधार-प्रशिक्षक जोडी ठरले होते. शास्त्री यांनी सांगितलं की विराटने निवृत्तीची घोषणा करण्यापूर्वी त्यांच्याशी चर्चा केली होती.रवी शास्त्री यांनी विराटच्या निवृत्तीबद्दल बोलताना आयसीसी रिव्ह्यूमध्ये संजना गणेशनला सांगितले की, "मी याबद्दल विराटशी बोललो होतो, मला वाटतं निवृत्तीची घोषणा करण्यापूर्वी एक आठवडा आधी आम्ही चर्चा केली होती. त्याच्या मनात हे अगदी स्पष्ट होतं की त्याने कसोटी क्रिकेट खेळताना आपलं सर्वस्व पणाला लावलं होतं." "विराटला कोणत्याही गोष्टीचा आता पश्चात्ताप नाही. मी त्याला एक दोन प्रश्न विचारले, जे अगदी वैयक्तिक प्रश्न होते आणि त्याने स्पष्टपणे मला सांगितलं की त्याच्या मनात कोणतीही शंका नाही.

त्यामुळे मलाही जाणवलं की हीच वेळ योग्य आहे. त्याच्या मनाने त्याला शरीराला सांगितलं होतं की आता कसोटी क्रिकेटला अलविदा करण्याची वेळ आली आहे." विराट कोहली हा भारताचा सर्वात यशस्वी कसोटी कर्णधार आहे. त्यांनी ६८ सामन्यांमध्ये भारताचे नेतृत्त्व केले आहे, त्यापैकी ४० कसोटी सामन्यांमध्ये भारताने विजय मिळवला. कोहली मैदानावर त्याच्या आक्रमकतेसाठी ओळखला जातो आणि शास्त्रींच्या मते अशा विचारसणीची माणसं मर्यादित काळासाठी असतात.शास्त्री पुढे म्हणाले, "जर त्याने एखादी गोष्ट करायची ठरवली की तो आपलं १०० टक्के देतो आणि ज्यावर मात करणं सोप नसतं. एखादा खेळाडू आपले काम करून बसतो, पण जेव्हा संघ मैदानावर असतो तेव्हा कोहलीला सर्व विकेट घ्यायच्या असतात. त्याला सगळे कॅच झेलायचे असतात. त्याला मैदानावर सर्व निर्णय स्वतः घ्यायचे असतात, इतका का तो प्रत्येक गोष्टीत सामील होतो. मला वाटतं जर त्याने विश्रांती घेतली नाही तर तो बर्नआउट होऊ लागतो. जर त्याने तिन्ही फॉरमॅटमध्ये कसं खेळायचं हे ठरवलं नाही, तर बर्नआउट होणं साहजिक आहे."विराटच्या कसोटी निवृत्तीपूर्वी चर्चा करूनही त्याच्या निवृत्तीचा मेसेज पाहून रवी शास्त्रींना धक्का बसला होता. याबद्दल बोलताना शास्त्री म्हणाले, "विराटने निवृत्तीची घोषणा करताच मला धक्का बसला होता. कारण, विराट अजून २-३ वर्ष कसोटी क्रिकेट खेळू शकला असता." "पण जेव्हा तुम्ही मानसिकरित्या गोंधळता आणि खचता तेव्हा शरीराला ते याबद्दल संकेत देतं. तुम्ही कदाचित शारिरीकरित्या फिट आहात, संघातील इतर खेळाडूंपेक्षाही फिट आहात पण मानसिकरित्या जर तुम्ही थकला असाल तर तुमच्या शरीराला ते संकेत देतं की बस्स आता थांबण्याची गरज आहे", असं शास्त्री म्हणाले.

### आता विराटला पश्चात्ताप नाही

विराट कोहलीने १२ मे रोजी कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. त्याने त्याच्या इन्स्टाग्रामवर एक लांबलचक पोस्ट लिहून निवृत्तीची घोषणा केली. कोहली कसोटी क्रिकेट तसेच जागतिक क्रिकेटमधील मोठं नाव आहे. अनेकांनी विराटच्या निवृत्तीबाबत आश्चर्य व्यक्त केलं. कोहली आणि शास्त्री हे भारतीय कसोटी क्रिकेट इतिहासातील सर्वात यशस्वी कर्णधार-प्रशिक्षक जोडी ठरले होते. शास्त्री यांनी सांगितलं की विराटने निवृत्तीची घोषणा करण्यापूर्वी त्यांच्याशी चर्चा केली होती.रवी शास्त्री यांनी विराटच्या निवृत्तीबद्दल बोलताना आयसीसी रिव्ह्यूमध्ये संजना गणेशनला सांगितले की, "मी याबद्दल विराटशी बोललो होतो, मला वाटतं निवृत्तीची घोषणा करण्यापूर्वी एक आठवडा आधी आम्ही चर्चा केली होती. त्याच्या मनात हे अगदी स्पष्ट होतं की त्याने कसोटी क्रिकेट खेळताना आपलं सर्वस्व पणाला लावलं होतं." "विराटला कोणत्याही गोष्टीचा आता पश्चात्ताप नाही. मी त्याला एक दोन प्रश्न विचारले, जे अगदी वैयक्तिक प्रश्न होते आणि त्याने स्पष्टपणे मला सांगितलं.

---


# एक लाख प्रेक्षक बसतील असं स्टेडियम उभारू

## रोहित शर्मा स्टँडच्या उद्घाटनानिमित्त फडणवीसांची घोषणा

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर आज शरद पवार स्टँड, रोहित पवार स्टँड, अजित वाडेकर स्टँड आणि एमसीएचे माजी अध्यक्ष अमोल काळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एमसीएच्या ऑफिस लाउंजचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.**




यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चारही मान्यवरांबद्दल गौरवोद्गार काढले. तसेच एमसीएने प्रस्ताव दिल्यास एक लाख प्रेक्षक बसू शकतील, अशा क्षमतेचे भव्य क्रिकेट स्टेडियम राज्यात बांधू, अशी घोषणा मुख्यमंत्री फडणवीसांनी केली.रोहित शर्मा यांच्या स्टँडचे उद्घाटन केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रोहित शर्मा यांच्या योगदानाचा उल्लेख केला. "रोहित शर्मा एक उत्कृष्ट फलंदाज आहेतच. त्याशिवाय ते एक चांगले कर्णधारही आहेत. लागोपाठ दोन महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा त्यांच्या नेतृत्वाखाली भारताने जिंकल्या. या स्पर्धांबद्दल क्रिकेट चाहत्यांच्या मनात अपूर्ण इच्छा होत्या, त्या त्यांनी पूर्ण केल्या. रोहित शर्मा यांचे मैदानावरील वागणे अतिशय मोकळे असते. त्यामुळेही त्यांची वेगळी अशी प्रतिमा निर्माण झाली. भारताच्या उत्कृष्ट कर्णधारांच्या मांदियाळीत रोहित शर्मा कधी जाऊन बसले, हे आपल्याला कळलेही नाही", असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. रोहित शर्मा यांनी सर्व फॉरमॅटमध्ये अतिशय सुंदर खेळ आपल्याला दाखवला. रोहित शर्मा यांचा एक शॉट कधी त्यांच्या नावाच्या स्टँडला जाऊन लागतो, याची आम्हाला उत्सुकता आहे. या क्षणाची सर्वच क्रिकेट चाहते वाट पाहत आहेत. एमसीएच्या इतिहासात पहिल्यांदाच विद्यमान खेळाडूचे नाव स्टँडला दिले जात आहे. हीदेखील एक दुर्मिळ गोष्ट आहे", असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.लॉर्ड्स ही क्रिकेटची पंढरी असल्याचे पूर्वी म्हटले जायचे. पण क्रिकेटची खरी पंढरी वानखेडे स्टेडियम आहे. पंढरी तिथे देव आणि क्रिकेटचा देव म्हणजे सचिन तेंडुलकर. त्यांचा पुतळा वानखेडे स्टेडियममध्ये आहे. क्रिकेटच्या पंढरीत आज जो सोहळा होत आहे, तो अतिशय महत्त्वाचा आहे, असेही देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. वानखेडे स्टेडियमला ५० वर्ष पूर्ण होत आहेत. पुढचे ५० वर्ष वानखेडे हे आयकॉनिक स्टेडियम म्हणून गणले जाईल. पण मागच्या काळात अमोल काळे आणि एमसीएच्या पदाधिकाऱ्यांनी एक लाख प्रेक्षक बसू शकतील.

### वानखेडेच क्रिकेटची पंढरी

असे स्टेडियम उभारण्याबद्दल चर्चा केली होती. मी आजच याठिकाणी सांगतो की, एमसीएने प्रस्ताव दिल्यास महाराष्ट्र सरकारच्या वतीने उचित जागा तुम्हाला दिली जाईल. किमान एक लाख लोक बसू शकतील असे स्टेडियम उभारू, अशी घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी केली.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शनिवार ।
। दि. 17 मे 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## हिंजवाडी येथील फोर स्टार क्रिकेट मैदानावर

# पीसीपीएल ट्वेंटी-20 क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात सुरू!

### माणिकचंद ऑक्सिरीचच्या कार्यकारी संचालिका जान्हवी धारिवाल-बालन यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।** पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट संघटने तर्फे आयोजित आणि ऑक्सिरीच पुरस्कृत 'पिंपरी चिंचवड प्रीमीअर लीग' (पीसीपीएल) ट्वेंटी-२० क्रिकेट स्पर्धेत छत्रपती संभाजी किंग्ज आणि विश्व टायगर्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेच्या उद्घाटनाचा दिवस गाजवला. स्पर्धेचे उद्घाटन माणिकचंद ऑक्सिरीचच्या कार्यकारी संचालिका जान्हवी धारिवाल-बालन यांच्या हस्ते करण्यात आले. हिंजवाडी येथील फोर स्टार क्रिकेट मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत विशाल गव्हाणे याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे छत्रपती संभाजी किंग्ज संघाने बंट्स वॉरीयर्सचा १८ धावांनी पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या छत्रपती संभाजी किंग्ज संघाने १४५ धावा धावफलकावर लावल्या. अथर्व भोसले (४१ धावा), अजिंक्य खानदेशे (२४ धावा) आणि विशाल गव्हाणे (२० धावा) यांनी संघाचा डाव बांधला. बंट्स संघाच्या प्रशांत तेलंगे याने ४ गडी बाद केले. या आव्हानाला उत्तर देताना बंट्स वॉरीयर्सचा डाव १२७ धावांवर मर्यादित राहीला. निनाद सी. याने ३८ धावांची आणि प्रशांत तेलंगे याने २१ धावांची खेळी केली. छत्रपती संभाजी संघाच्या सईश शिंदे याने तीन गडी तर, विशाल गव्हाणे आणि हरीश बाकळे यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून संघाला शानदार विजयी सलामी मिळवून दिली.

BLOSSOM YOUR KNOWLEDGE
SVSPM'S

Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's

GAYATRI GROUP OF SCHOOLS

Moshi | Charholi | Dighi

Continuing a Tradition of Exellence!
Gayatri Group of Schools, Pune
Bagged Spectacular SSC & CBSE Result

Congratulations



Hon. Mr. Vinayakrao Bhongale
Founder & President, SVSPM

Under the guidance of
Hon. Mr. Vinayakrao Bhongale,

Gayatri Group of Schools, Pune
Academic Year 2024-25 celebrates a spectacular Std. 10th & 12th result, a proud reflection of our commitment to academic excellence.

Std. 10th Result



Yash Bhosale 97.40%
Bramhi Magdum 95.40%
Nidhi Patil 94.40%
Shravni Thorat 94.00%
Emmanuel Kennedy 93.00%
Sanskruti Kokate 92.20%
Swapnil Yadav 92.00%
Anushka Shinde 92.00%
Mahima Jangir 90.60%
Jiya Mittal 90.00%
Yash Marathe 89.80%
Pradnya Choukate 89.80%
Pallavi Kurne 89.80%
Satvik Durgakeri 89.60%



Shruti Farkade 87.80%
Bhargavi Phule 87.60%
Sanchita Shelke 87.60%
Anuj Barkale 86.60%
Tanuja Gurav 86.40%
Chahat Mehta 86.40%
Swaraj Awate 85.80%
Om Jadhav 85.60%
Rohit Patil 85.40%
Prerana Gani 85.20%
Shashvat Jain 85.00%
Anushka Badake 85.00%
Swarupa Kulkarni 85.00%

Std. 12th Result



Dhruv Luthra 95.40%
Sai Ugale 93.63%
Srushti Shewalkar 93.60%
Aashna Maru 92.80%
Arjun Pradhan 91.80%
Prakhar Sethi 90.80%
Rohan More 90.80%
Pranitee Khedkar 88.83%
Dhriti Shetty 88.80%
Rudresh Kumbhare 88.80%
Anjali Thapa 88.67%
Aditi Deokar 88.33%
Krisha Gabda 88.20%
Shreya Pandey 87.80%
Samruddhi Date 87.17%
Arpit Singh 87.00%
Santosh Waghmare 86.83%
Atharva Shile 86.67%

ADMISSION OPEN

## Moraya Shikshan Sanstha

"यत् भावो – तत् भवति"

# Computer 15 days Crash Course

## Our Courses



- PowerPoint with animation
- Basic Excel
- Corel Draw
- Adobe Photoshop
- Scratch Animation
- 'C' Language
- Basic Java
- Basic Tally

From

26th May 2025

1 Hour /day

Monday to Saturday

Contact
8087706100
Registration started
Venue: Computer Lab,
V. K. Mate Highschool

## महिलांच्या सुरक्षेबाबत उपाययोजनांसाठी उद्योगमंत्र्यांना पत्र

# ‘त्या’ पीडीतेचा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवा!

### सुलभा उबाळे : शिवसेना आक्रमक ; जिल्ह्यातील महिला कामगारांच्या सुरक्षेकडे वेधले लक्ष






। नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**चाकण येथील मेदनकरवाडी भागामध्ये कंपनीत कामावर निघालेल्या महिलेला अंधाराचा फायदा घेत रस्त्यावरून फरफटत निर्जनस्थळी नेत तीच्यावर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (१३ मे) रात्री साडेदहा वाजता घडली. या पिडीतेला न्याय मिळावा आरोपीला तात्काळ शिक्षा व्हावी.यासाठी फास्टट्रॅक कोर्टात खटला दाखल करण्यात यावा.तसेच एमआयडीसी भागातील महिला कामगारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कंपनी व्यवस्थापनाने योग्य सुरक्षा पुरवाव्यात. यासाठी शिवसेना आक्रमक झाली आहे. उद्योगमंत्री, पोलीस प्रशासनाला पत्र देत याबाबत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी शिवसेना उपनेत्या सुलभा उबाळे यांनी केली आहे.**

याबाबत सुलभा उबाळे यांनी उद्योग मंत्री उदय सावंत, सह पोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना निवेदन दिले आहे. दिलेल्या निवेदनात उबाळे यांनी म्हटले आहे. पीडित महिला नाईट शिफ्टसाठी कंपनीत जात होती. या दरम्यान अज्ञात इसमाने तिचा पाठलाग करत खंडोबा मंदिराजवळ तिचा रस्ता अडवला. त्यानंतर जबरदस्तीने ओढत निर्जनस्थळी नेऊन तिच्यावर अत्याचार केले. या घटनेने एमआयडीसीमध्ये काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षीततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

हा प्रश्न आता केवळ चाकण एमआयडीसी पुरता मर्यादित राहिलेला नाही. पुणे जिल्हयामध्ये कार्यरत असणाऱ्या सपूर्ण औद्योगीक क्षेत्रामध्ये महिलांना सुरक्षा प्राधान्य करण्यासाठी ठोस पावले उचलावीत. त्याअंतर्गत संपूर्ण कंपन्यांमध्ये रात्रपाळीमध्ये काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना ये जा करण्यासाठी कंपनीतर्फे गाडी व सुरक्षा पुरवणे गरजेचे आहे. तसेच ज्या महिला नाईट शिफ्टमध्ये विविध कंपन्यांमध्ये काम करतात. त्यांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र नियमावली करणे गरजेचे आहे असे देखील सुलभा उबाळे यांनी म्हटले आहे.

### फास्टट्रॅक कोर्टात खटला चालवा

दरम्यान चाकण येथे घडलेली घटना अत्यंत निंदनीय आहे.या भागामध्ये अनेक कंपन्यांमध्ये महिला काम करतात. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आहे. या भागामध्ये मूलभूत सुविधांचा प्रश्न आहेच शिवाय महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न देखील आहे त्यामुळे यामध्ये ठोस कार्यवाही व्हावी. पुणे जिल्हयातील विविध औद्योगिक आस्थापना, लघुउद्योग या सर्वांसोबत पोलीस प्रशासन यांची बैठक घेतली जावी. हे प्रकरण संवेदनशील असल्याने तातडीने फास्ट ट्रॅक कोर्टात खटला दाखल करावा आणि पीडितेला न्याय द्यावा असे सुलभा उबाळे यांनी म्हटले आहे.

### शिवसेना पीडित महिलेच्या पाठीशी

सुलभा उबाळे यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण रुग्णालयामध्ये चाकण घटनेतील पीडित महिलेची भेट घेतली.या महिलेच्या पाठीशी शिवसेना खंबीरपणे उभी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी शिवसेना पुणे जिल्हा संपर्क प्रमुख गीतांजली ढोणे, शिल्पा अनपण उपस्थित होत्या.